Publication: Lokmat
Date: 30/3/2019
Page: 2
Column: 3

लोकमत मुंबई, शनिवार, दि. ३० मार्च २०१९

# आज 'अर्थ अवर'

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जागतिक तापमानात प्रचंड वाढ होत आहे. याबाबत जनजागृतीसह वाढते तापमान कमी करण्यासाठी जगभरात शनिवार, ३० मार्च रोजी रात्री साडेआठ ते साडेनऊपर्यंत 'अर्थ अवर' पाळण्यात येणार आहे. या वेळेत जगभरात दिवे बंद करण्याचे आवाहन केले जाणार असून, 'ग्लोबल वॉर्मिंग' रोखण्यासाठी प्रयत्न केले जातील.

पृथ्वीचे सरासरी भूपृष्ठीय तापमान १९ व्या शतकाच्या अखेरपासून १.२० सेल्सिअसने वाढले. १७५० साल म्हणजे औद्योगिकीकरण पूर्व काळाशी तुलना करता ते १.३० सेल्सिअसने वाढले. हा बदल कार्बन डायऑक्साइडच्या उत्सर्जनात वाढ झाल्यामुळे घडला. तसेच माणसामुळे वातावरणात झालेले औद्योगिक उत्सर्जनही यास कारणीभूत आहे. २०१६ या वर्षातील विक्रमी उष्म्यामुळे त्याची नोंद आतापर्यंतचे सर्वांत उष्ण वर्ष म्हणून झाली. ही तापमानवाढ २०१९ मध्येही सुरुच राहील, असा इशारा जागतिक हवामानशास्त्र संस्थेने दिला आहे. याबाबत जनजागृतीसाठी वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचरतर्फे जगभरात 'अर्थ अवर' साजरा केला जात असून, मुंबई शहर, उपनगरातील पर्यावरणाशी निगडित स्वयंसेवी संस्थांसह सरकारी आणि निमसरकारी कार्यालये, नागरिकही या उपक्रमात सहभागी होतात.

दरम्यान शनिवारी सर्वांनी घर, आस्थापनांतील वीजवापर रात्री ८.३० ते ९.३० या काळात स्वेच्छेने बंद ठेवण्याचे आवाहन वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचरतर्फे करण्यात आले आहे.